www.rajdand.com
सातारा बुधवार
२८. २. २०२४
पृष्ठ ४ ! मुल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

## महत्त्वाचे

### टीम इंडियाच नाही तर मुंबईच्या संघात राहण्यासाठीही अजिंक्यचा संघर्ष

**मुंबई** : कधीकाळी भारतीय संघाचा आघाडीचा फलंदाज म्हणून प्रसिद्धीच्या शिखरावर असलेला मराठमोळा अजिंक्य रहाणे आताच्या घडीला देशांतर्गत क्रिकेटमध्ये देखील संघर्ष करत आहे. टीम इंडियातून बाहेर पडल्यानंतर रणजी ट्रॉफीच्या स्पर्धेतील मुंबईच्या संघातूनही बाहेर होण्याची टांगती तलवार रहाणेवर आहे. कारण मागील दहा डावांमध्ये अजिंक्यला साजेशीही खेळी करता आली नाही. ०२ / १०जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यात रहाणेला भारतीय संघात स्थान मिळाले होते. त्यानंतर त्याने एक द्विपक्षीय मालिका खेळली पण त्याचा फ्लॉप शो कायम राहिला. ०३ / १०अजिंक्य रहाणेने आपल्या टिकाऊ फलंदाजीच्या जोरावर भारताला अनेक सामने जिंकून दिले आणि अनेक सामन्यात भारताला पराभवापासून वाचवले आहे. फलंदाजीत चिवट असलेला रहाणे कालांतराने टेस्ट स्पेशलिस्ट म्हणून ओळखला जाऊ लागला. त्यामुळे त्याच्याकडे भारताच्या कसोटी संघाचे नेतृत्व सोपवण्यात आले होते. ०४ / १०२०२०-२१ मध्ये जेव्हा भारताने ऑस्ट्रेलियाचा दौरा केला तेव्हा विराट कोहली पहिला कसोटी सामना खेळून मायदेशी परतला. अशा परिस्थितीत रहाणेने संघाचे नेतृत्व करत संघाला मालिकेत विजय मिळवून दिला. ०५ / १०अशा परिस्थितीत रहाणेने संघाचे नेतृत्व करत संघाला मालिकेत विजय मिळवून दिला. मात्र आता रहाणे संघाबाहेर आहे.

# विकसित महाराष्ट्राला चालना देणारा अर्थसंकल्प : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई** : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पनेला अनुसरून विकसित म हाराष्ट्राला चालना देणारा अर्थसंकल्प आज शासनाने सादर केला, असे सांगत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांचे अभिनंदन केले आहे.

हा अंतरिम अर्थसंकल्प सर्वच घटकांचा विचार करणारा तसेच राज्याच्या समतोल विकासाचा आहे. सबका साथ सबका विकास या मंत्रावर आधारित या अर्थसंकल्पाने शेतकरी, महिला, युवा, विविध समाज घटकांना मोठा दिलासा देणारा आहे. विदर्भातील सिंचन सुविधांसाठी २००० कोटींची तरतूद त्यात करण्यात आली आहे. शेतकऱ्यांसाठी मागेल त्याला सौर कृषिपंप योजना जाहीर करण्यात आली असून ८.५० लाख कृषिपंप पहिल्या टप्प्यात देण्यात येणार आहेत. ३७,००० अंगणवाड्यांना सुद्धा सौर ऊर्जेवर आणण्यात येणार आहे. दिव्यांगासाठी ३४,४०० घरकुले बांधण्यात येणार आहेत. नागपूर विभागीय क्रीडा संकुलाला राज्य क्रीडा संकुलाचा दर्जा देण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर विमानतळासाठी ५७८ कोटी रुपये जाहीर करण्यात आले आहेत. सर्वच पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी मोठी आर्थिक तरतूद यात करण्यात आली आहे. राज्यात २००० नवीन प्रमोद महाजन कौशल्य विकास केंद्र सुरू करण्यात येणार आहेत. आज मराठी भाषा गौरव दिवस असून कवितेचे गाव म्हणून वेंगुर्ला गावाचा विकास करण्याची सुद्धा तरतूद यात आहे. एकूणच आपल्या संस्कृतीचा गौरव सुद्धा यात आहे, असेही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी म्हटले आहे.



# राज्यात आजही गारपीठचा इशारा

### थंडी सुरूच, पावसाचीही शक्यता



**पुणे**: राज्यामध्ये अनेक भागामध्ये सोमवारी सायंकाळी गारपीठ झाली. त्यामुळे पीकांचे नुकसान झाले असून, आजही विदर्भ, मराठवाड्यातील बऱ्याच ठिकाणी यलो अलर्ट भारतीय हवामान विभागाने दिला आहे.भारतीय हवामान विभागाने आज विदर्भामधील चार जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. त्यामध्ये बुलढाणा, अकोला, अमरावती आणि नागपूर जिल्ह्यांचा समावेश आहे. या ठिकाणी वीजांसह हलक्या पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. तसेच यवतमाळ, वर्धा, भंडारा, वाशीम या जिल्ह्यांमध्ये काही भागात हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. दरम्यान, मराठवड्यातील बीड, हिंगोली, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी जिल्ह्यांमध्ये आज हलक्या स्वरूपाच्या पावसाचा इशारा देण्यात आला आहे.पुणेशहरात ढगाळ वातावरण राहील, असा अंदाज आहे. दोन दिवसांपूर्वी पुण्यात प्रचंड गारठा होता, तो आता कमी झाला आहे. किमान तापमान आता १८ अंश सेल्सिअस नोंदवले गेले आहे.

# राज्यात मराठा आरक्षण कायदा लागू, २६ फेब्रुवारीपासून अंमलबजावणी सुरू

**मुंबई** : मराठा आरक्षणासंदर्भात राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. राज्य विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात मंजूर करण्यात आलेल्या मराठा आरक्षण कायद्याची आता राज्यात अंमलबजावणी सुरु झाली आहे. २६ फेब्रुवारीपासून हे आरक्षण लागू झाले आहे. याबाबत शासन निर्णयासह राजपत्र जारी करण्यात आले.

विधिमंडळात मराठा आरक्षणाचे विधेयक एकमताने मंजूर झाल्यानंतर ते राज्यपालांकडे पाठवण्यात आले होते. राज्यपालांनी त्यावर सही केल्यानंतर आता या विधेयकाचे कायद्यात रुपांतर झाले आहे. यासंदर्भात शासन निर्णय, बिंदुनामावली आणि राजपत्रही जारी करण्यात आले आहे. कायदा आणि न्यायपालिका विभागाचे सचिव सतीश वाघोले यांनी सही केली आहे. त्यामुळे आता मराठा समाजाला स्वतंत्र संवर्गातर्गत नोकरी आणि शिक्षणात १० टक्के आरक्षण लागू झाले आहे.

सध्या राज्यात आधीपासूनच सुरु असलेल्या शासकीय नोकरभरतीसाठी हे आरक्षण लागू नसेल. परंतु, २६ फेब्रुवारी आणि त्यानंतर सुरु होणाऱ्या नोकऱ्यांमध्ये मराठा समाजासाठी १० टक्के जागा आरक्षित असतील. गेल्या अनेक दिवसांपासून मराठा आरक्षणाची मागणी जोर धरत आहे. दरम्यान आज राज्यात कायदा लागू झाल्याचे चित्र आहे.

आरक्षण दिल्याचा आनंद आहे - मुख्यमंत्री

याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मला आनंद आहे मी शपथ घेतलेली पूर्ण केली. मराठा समाजाला आरक्षण लागू झाले आहे. जीआर निघाला आहे. याचा फायदा मराठा तरुणांना नोकरीत आणि शिक्षणात होईल. याचे समाधान सरकार आणि मला आहे. या निर्णयाचा फायदा मराठा समाजाने घ्यावे. शिवाजी महाराजांच्या साक्षीने मी बोललो होतो ते पूर्ण केले. कोणत्याही समाजावर अन्याय न करता हे मराठा समाजाला टिकणारे आणि कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण दिल्याचा आनंद आहे.

# भारताच्या पहिल्या मानवी अंतराळ मोहिमेसाठी ४ जणांची निवड

**नवी दिल्ली** : चंद्र आणि सूर्य मोहिमेवर आपल्या यशस्वी कामगिरीचा ठसा उमटवल्यानंतर आता भारत अंतराळ मोहिमेसाठी सज्ज झाला आहे. इस्रो सध्या गगनयान मिशवर काम करत आहे. चांद्रयान-३ आणि आदित्य एल-१ ला मिळालेल्या यशानंतर इस्त्रो अंतराळ संशोधनासाठी नवीन उपक्रम राबवत आहेत. गगनयान भारताचे पहिली मानव मोहिम असणार आहे. गगनयान मोहिमेच्या माध्यमातून भारत पहिल्यांदा मानवाला आकाशात पाठवणार आहे. गगनयान मोहिमेसाठी कोणत्या अंतराळवीरांची निवड होणार यावरुन आता पडदा उठला आहे.

पंतप्रधान मोदी यांनी २०१८मध्ये गगनयान मोहिमेची घोषणा केली होती. भारत स्वबळावर अंतराळवीरांना अवकाशात पाठवणार आहेत. गगनयान मोहिमेसाठी उए७% श्ज्ञ३ हे प्रक्षेपक रॉकेट निवडण्यात येणार आहे. या मोहिमेमध्ये अंतराळवीर पाठवण्याची तयारी सुरू आहे. या मोहिमेसाठी चार आंतराळवीरांची नावे निश्चित करण्याची आल्याची माहिती समोर येतेय.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गगनयान मोहिमेतील चारही आंतराळवीरांना एस्ट्रोनॉट्स विंग्स दिले आहेत. आता या चार जणांची नावे समोर आली आहेत. हे चारही जण हवाई दलातील टेस्ट पायलट आहेत. त्यांची नावे आहेत, ग्रुप कॅप्टन प्रशांत नायर, अंगद प्रताप, अजित कृष्ण आणि विंग कमांडर शुभांशु शुक्ला. पंतप्रधान मोदींनी या चारही जणांना आझ पहिल्यांदाचा जगासमोर जाहीर केले आहे. या चारही जणांची रशियात ट्रेनिंग झाली असून सध्या बेंगळुरूमध्ये एस्ट्रोनॉट ट्रेनिंग फॅसिलिटीमध्ये प्रशिक्षण देण्यात येत आहे.

गगनयान मिशनसाठी हजारो वैमानिकांची चाचणी घेण्यात आली होती. त्यातील १२ जणांना निवडण्यात आले. त्यानंतर या सर्वांची निवड इंस्टीट्यूट ऑफ एयरोस्पेस मेडिसन (घ्अश)मध्ये करण्यात आली होती. त्यानंतर अनेक चाचण्या व परीक्षा घेतल्यानंतर त्यांची निवड प्रक्रिया पूर्ण झाली. तेव्हा इस्रो आणि वायुसेनेने या चार वैमानिकांची नावांवर शिक्कामोर्तब झाले. वैमानिकांची निवड झाल्यानंतर इस्रोने २०२०च्या सुरुवातीला त्यांना रशियाला प्रशिक्षणासाठी पाठवले होते. जेणेकरुन तिथे त्यांना मोहिमेसंदर्भातील सर्व प्रशिक्षण दिले जाईल.

सध्या या चारही वैमानिकांची प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसंच, त्यांच्या फिटनेसवरही लक्ष देण्यात येत आहे. मात्र, हे चारही वैमानिक गगनयान मोहिमेत अंतराळात जाणार नाहीयेत तर. यातील दोन किंवा तीनच वैमानिक अवकाशात गगनयान मोहिमेसाठी निवडण्यात येणार आहे.

# वाढता महसुली खर्च, वाढते कर्ज आणि मर्यादित उत्पन्न

### सरकारसमोर वित्तीय व्यवस्थापनाचे मोठे आव्हान

**मुंबई**: आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वित्तमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी सर्व घटकांसाठी तरतुद असलेला ६ लाख ५२२ कोटी रुपयांच्या खर्चाची तरतुद असलेला अर्थसंकल्प सादर केला आहे. मात्र वाढणारा महसूली खर्च, लोकप्रिय योजनांवर होणारा खर्च, राज्यावरील वाढते कर्ज आणि त्या तुलनेत आर्थिक उत्पन्नाची मर्यादीत साधने यामुळे सरकारसमोर वित्तीय व्यवस्थापनाचे मोठे आव्हान आहे.

राज्याची राजकोषीय तूट आणि महसुली तूट कायद्याने निश्चित केलेल्या मर्यादेत ठेवण्याचा प्रयत्न अजित पवारांनी अर्थसंकल्पात केला आहे. मात्र ही परिस्थिती कायम ठेवण्यात त्यांना कसरत करावी लागणार आहे. कारण एकीकडे महसूलात वाढ झाली नाही तर अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदींना कात्री लावण्याची वेळ वित्तमंत्र्यांवर येऊ शकते.

राज्याच्या २०२४-२५ च्या अंतरिम अर्थसंकल्पात ९,७३३ कोटी रुपयांच्या महसूली तुटीचा अंदाज वर्तवला आहे. मात्र मागील वर्षाची स्थिती लक्षात घेता ही तूट वाढण्याची शक्यता आहे. मागील २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात अंदाजित महसुली तूट १६,१२२ कोटी रुपये गृहित धरण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात ती १९,५३१ कोटी रुपयांवर गेली आहे. त्याचप्रमाणे २०२४-२५ च्या अंतरिम अर्थसंकल्पात राजकोषीय तूट ९९,२८८ कोटी रुपये अंदाजित केली आहे. मागील २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात ९५,५०० कोटी रुपये राजकोषीय तुटीच्या अंदाजाच्या तुलनेत प्रत्यक्षात ही तूट १,११,९५५ कोटी रुपये नोंदवण्यात आली आहे.

प्रामुख्याने पगार, पेन्शन आणि व्याजावरील वाढता खर्च हा सरकारसाठी चिंतेचा विषय आहे. मागील २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात पगारावर राज्य सरकारचा खर्च १,४२,७१८ कोटी रुपये अपेक्षित होता, मात्र प्रत्यक्षात त्यात ११.४३ टक्क्यांनी वाढ होऊन तो १,५९,०३४ कोटी रुपये झाला आहे. पेन्शनवरील अंदाजित खर्च ६०,४४६ कोटी रुपयांच्या तुलनेत २२.४४ टक्क्यांनी वाढून तो ७४,०११ कोटी रुपये झाला आहे. सरकारने नोव्हेंबर २००५ पूर्वी जारी केलेल्या जाहिरातीद्वारे नियुक्त केलेल्या सरकारी कर्मचाऱ्यांसाठी जुन्या पेन्शन योजनेचा पर्याय दिल्याने हा खर्च आणखी वाढणार आहे. तर कर्जावरील व्याजाचा अंदाज मागील अर्थसंकल्पात ४८,५७८ कोटी रुपये होता, तो प्रत्यक्षात १६.५५ टक्क्यांनी वाढून ५६,७२७ कोटी रुपये झाला आहे.

**वाढते कर्ज**

**राज्यावरील कर्ज राज्यावर २०२३-२४ च्या आर्थिक वर्षात ७,११,२७८ कोटी रुपये इतके होते. २०२४-२५ च्या अंतरिम अर्थसंकल्पात हे कर्ज ७,८२,९९१ कोटी रुपयांवर जाईल असे अंदाजित करण्यात आले आहे. हे कर्ज जरी सकल राज्य देशांतर्गत उत्पादनाच्या २५% मर्यादेच्या आत असले तरी, उत्पन्नात वाढ होत नसल्याने वाढणारे कर्ज सरकारसाठी चिंतेची बाब ठरू शकते.**

# राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे नेते प्रफुल्ल पटेल यांचा राज्यसभेच्या सदस्यत्वाचा राजीनामा



**मुंबई** : अजित पवार गटाचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी राज्यसभेच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. राज्यसभा सचिवालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करणारे राज्यसभेचे निवडून आलेले सदस्य प्रफुल्ल पटेल यांनी राज्यसभेच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. २७ फेब्रुवारी २०२४ला राज्यसभेच्या अध्यक्षांनी त्यांचा राजीनामा स्वीकारला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून यंदाच्या निवडणुकीसाठी प्रफुल्ल पटेल यांना राज्यसभेची उमेदवारी जाहीर झाली. ते याआधीच राज्यसभेचे सदस्य होते. मे २०२७ पर्यंत त्यांचा कार्यकाळ होता. पण तांत्रिक कारण पुढे करून पटेल यांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली.


अजित पवार गटाकडून उमेदवारी जाहीर झाली त्यावेळी प्रफुल्ल पटेल म्हणाले होते की, मला राज्यसभेची उमेदवारी घोषित केल्याबद्दल मी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सर्व सहकाऱ्यांचे आभार मानतो. माझ्या राजीनाम्यामुळे रिक्त होणाऱ्या जागी अन्य कुणाला संधी मिळेल. त्यामुळे फार अफवा पसरवण्याची गरज नाही. ज्या गोष्टी तुम्हाला रहस्य वाटतायेत त्या आम्हाला वाटत नाही. अनेक गोष्टी भविष्यात समोर येतील. त्यानंतर प्रफुल्ल पटेल यांनी मुंबईतील सिद्धिविनायक मंदिरात दर्शन घेतले होते.

**प्रफुल्ल पटेल यांच्या रिक्त जागी काय होणार?**

मिळालेल्या माहितीनुसार, प्रफुल्ल पटेल यांच्या जागी पोटनिवडणूक लागेल. ती जागा राष्ट्रवादी काँग्रेस लढवेल, त्यासाठी भाजप आणि शिवसेनेची संमती घेतली आहे. काही तांत्रिक गोष्टींचा विचार करुन आमच्या कोअर ग्रुपने हा निर्णय घेतला आहे, असेही नेते सुनील तटकरे म्हणाले. पक्षासमोर दहा जणांनी राज्यसभेची उमेदवारी मिळावी म्हणून मागणी केली होती. याबाबत पक्षाच्या सर्व वरिष्ठांनी सर्व बाजूचा विचार करुन पक्षाने हा निर्णय घेतला आहे, असेही पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे म्हणाले.

# जरांगेंची भाषा आणि मागण्या बदलत गेल्या!

**मुंबई** : विधानसभेत आज विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची एसआयटी चौकशी करण्याचे आदेश दिले. यानंतर जरागेंनी पुन्हा सरकारलाच आव्हान दिले आहे. काय चौकशी करायची ती करा, मी देखील सर्व उघड करतो, असं ते म्हणाले आहेत. जरांगेंची पातळी सोडत चाललेली भाषा, देवेंद्र फडणवीसांवर केलेले गंभीर आरोप, बदलत गेलेल्या मागण्या या सर्वच बाबींवर आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लेखाजोखा मांडला. 'मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांची इज्जत काढली. असं कुठं चालतं का? एकेरी पद्धतीने बोलणं हे शोभतं का?' असं मुख्यमंत्र्यांनी मनोज जरांगेंना खडसावलं आहे.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मी दोन वेळा एवढ्या संख्येने आलेल्या मराठा समाजाला सामोरा गेलो. मला मनोज जरांगे यांच्याशी काही देणं घेणं नाही. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांची इज्जत काढली. असं कुठं चालतं का? एकेरी पद्धतीने बोलणं हे शोभतं का? मनोज जरांगे यांची भाषा कार्यकर्त्याची भाषा नाही, ही भाषा राजकीय भाषा आहे. जाती-जातीत भांडण लावण्याचा प्रयत्न आहे, हे लक्षात आलं. जी अधिसूचना काढण्यात आली, त्यावर साडे सहा लाख हरकती आल्या आहेत, असं मुख्यमंत्री शिंदेनी सांगितलं.

आपण टिकणारे आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता त्या प्रमाणे आपण आरक्षण दिलं आहे. समाजावर अन्याय न करता आम्ही आरक्षण दिलं आहे. सह्याद्रीवर जी बैठक झाली त्यामधे एकमताने आरक्षण देण्याचा निर्णय झाला त्या प्रमाणे आपण केलं. आरक्षण दिल्यानंतर ते टिकणार नाही अशी चर्चा विरोधकांनी केली. राज्य सरकारला ५० टक्क्यांच्या वर आरक्षण देता येत नाही. तरीदेखील आपण १० टक्के आरक्षण दिलं आहे. हे आरक्षण कोर्टात टिकेल असा विश्वास आहे. ज्या त्रुटी कोर्टाने काढल्या होत्या त्या पूर्ण केल्या आहेत. सोशली मराठा समाज कसा मागास आहे हे आपण दाखवले आहे, असं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं.

सरसकट प्रमाणपत्र देता येणार नाही हे त्यांना स्पष्टं सांगितलं होतं

मराठा समाज आरक्षणाची मागणी करत होतं त्याची टिंगल टवाळी कुणी केली याबाबत मी बोलणार नाही. आरक्षण देत असताना मनोज जरांगे यांनी कुणबी दाखले देण्याची मागणी केली त्या प्रमाणे यंत्रणा लावून कुणबी नोंदी शोधल्या. त्यासाठी १९६७ पूर्वीच्या कायद्याचा आधार घेतला. शिंदे समितीचं काम उत्तम आहे असं स्वत: मनोज जरांगे म्हणाले होते. पूर्णपणे सरकारने मराठा समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. मनोज जरांगे यांनी सरसकट प्रमाणपत्र देता येणार नाही हे मी त्यांना स्पष्टं सांगितलं होतं. सगेसोयरेचा त्यानंतर मुद्दा आला. त्यांच्या सातत्यानं मागण्या बदलत गेल्या त्यांनंतर ओबीसी मधून आरक्षण देण्याची मागणी त्यांनी केली.

मी जे बोलतो ते करून दाखवतो

मराठा समाजाच्या जीवावर अनेक नेते मोठे झाले मात्र त्यांनी मराठा आरक्षण दिलं नाही. मी जे बोलतो ते करून दाखवतो. ओबीसी समाज आरक्षण धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्यात येणार अशी भूमिका मी घेतली. आम्ही जोपर्यत सत्तेत होतो तोपर्यत आरक्षण कोर्टात टिकलं होतं. मात्र महाविकास आघाडी सरकार आल्यानंतर ते आरक्षण कोर्टात टिकलं नाही. देवेंद्र फडणवीस यांच्या काळात सारथी सुरू केलं. अण्णासाहेब आर्थिक विकस महामंडळ जीवदान देवेंद्र फडणवीस यांनी दिलं. मराठा समाजाला ओबीसी समाजाप्रमाणे सोयी सुविधा दिल्या जातील याची घोषणा केली.

प्रत्येकाने स्वत:ची मर्यादा ओळखायला हवी

जरांगेंच्या आरोपांची चौकशी एसआयटी स्थापन करण्याचे आदेश विधानसभा अध्यक्षांनी दिले आहेत. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी म्हटलं की, 'हिंसा अथवा हिसंक वक्तव्य याला लोकशाहीत स्थान नाही. यासाठी योग्य उपाययोजना करण्याची जबाबदारी शासनाची आहे.याच गांभीर्य लक्षात घेत शासनाने याची सखोल एसआयटी चौकशी करावी.' कुणी दगड जमा केले? कुणी दगड मारले? याचा अहवाल पोलिसांकडे आहे. आता सरकार कुणावरही अन्याय करणार नाही. प्रत्येकाने स्वत:ची मर्यादा ओळखायला हवी, असा इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला आहे.

# तीन दशकं श्रोत्यांच्या मनावर राज्य करणारा गजलसम्राट..!



गजल म्हटलं की, आपोआप तोंडावर नाव येतं ते पदमश्री पंकज उधास यांचं! रसिक, श्रोते सोडाच आपल्या 'त्रेव त्रळर्षी' आवाजाने आणि मनाला स्पर्श करून जाणाऱ्या अप्रतिम गजल गायनाद्वारे अगदी सामान्य माणसांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा 'गजलसम्राट' म्हणून पंकज उधास यांचे नाव कायम अजरामर राहील. २६ फेब्रुवारी २०२४ रोजी हा गजलसम्राट काळाच्या पडद्याआड गेला आणि भारतातीलच नव्हे तर, जगभरातील लाखो, करोडो गजल शौकिनांना 'उदास' करून गेला!

'चिठ्ठी आयी है..' ही त्यांची गझल अजरामर होती, आहे आणि राहिल यात काही शंकाच नाही. 'चांदी जैसा रंग हो तेरा सोने जैसे बाल..' ही गझल ऐकून तर एक पिढी मोठी झाली आहे. या प्रकारचं प्रेम व्यक्त करणारी गझल असो किंवा 'चिठ्ठी आयी है..' सारखी विराणी असो त्यासाठी पंकज उधास हे कायमच स्मरणात राहतील.

भारताच्या संगीत क्षेत्रातील मोठं नाव असलेल्या पंकज उधास यांचा जन्म गुजरातच्या राजकोट येथे १७ मे १९५१ रोजी 'जमीनदार' घराण्यात झाला. पंकज उधास हे मूळचे गुजरातमधील जीतपूरचे. त्याचे वडील शेतकरी होते. पंकज यांना दोन भाऊ असून ते सर्वात छोटे होते. त्यांचे दोन्ही मोठे भाऊ मनहर उधास व निरमल उधास हे देखील गझल गायक आहेत. 'चिट्ठी आई है' 'चांदी जैसा रंग है तेरा', अशा गाण्यांमुळे पंकज उधास यांना प्रसिद्धी मिळाली. त्यांनी सर्वात पहिला स्टेज परफॉर्मन्स लता मंगेशकर यांच्याबरोबर केला होता. तलत अजीज, जगजीत सिंग यांच्यासारख्या महान गायकांच्या यादीत पंकज उधास यांचे नाव नेहमीच लोकप्रिय राहिले आणि कायम राहील. उधास यांनी भारत- चीन युद्धाच्या वेळी पहिल्यांदा रंगमंचावर 'ऐ मेरे वतन के लोगो' हे गीत गायले (त्यावेळी श्रोत्यांनी त्यांना ५१ हजार रुपयांचं बक्षीस दिलं) आणि त्यांनी आपल्या संगीत कारकिर्दीला खऱ्या अर्थाने प्रारंभ केला. यांनतर त्यांनी एका 'बार' मध्येही काम केले.

१९७२ मधील चित्रपट 'कामना' द्वारे त्यांनी भारतीय चित्रपट सृष्टीमध्ये गायक म्हणून पदार्पण केले. मात्र हा चित्रपट यशस्वी ठरला नाही. त्यांनतर उधास यांनी गजल गायनाला सुरुवात केली ती कॅनडा मधून! कॅनडा आणि अमेरिकेत त्यांनी छोट्या- मोठ्या कार्यक्रमांमध्ये गजलगायन केले. काही काळांनंतर ते भारतात परत आले. १९८० मध्ये त्यांनी स्वतःचा 'आहट' हा अल्बम प्रसिद्ध केला. यांनतर ते प्रसिद्धीच्या झोतात आले. तेव्हापासून ते २००९ पर्यंत उधास यांचे तब्बल ४० अल्बम प्रसिद्ध झाले होते.

कॅसेटचा काळ असतानाचा सुपरहिट गायक अशी पंकज उधास यांची ओळख होती. 'ना कजरे की धार', 'आज फिर तुमपे प्यार आया है..' 'जिये तो जिये कैसे', 'और आहिस्ता' अशी किती तरी गाणी आहेत जी आजही प्रेक्षकांना आठवतात ती त्यांच्या शब्दांमुळे आणि पंकज उधास यांच्या मधुर आवाजामुळे.

चिठ्ठी आयी है, जिये तो जिय कैसे, चुपके चुपके, और आहिस्त किजिए बाते, ना कजरे की धार, आप जिनके करीब होते है, वो लडकी याद आती है, घुंगरू तुट गए, चांदनी रात मे, एक तरफ उसका घर, चांदी जैसा रंग, थोडी थोडी पिया करो, मयखाने से शराब से, दिवारो से मिलक रोना अच्छा लगता है अशी असंख्य गाणी खूपच लोकप्रिय आहेत आणि आजही त्यांची गाणी लाखो ओठ गुणगुणतात!

१९८६ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'नाम' या चित्रपटातील 'चिट्ठी आयी है' या गाण्याला पंकज उधास यांनी आवाज दिला होता. आजही हे गाणे ऐकून लोकं भावुक होतात. हा चित्रपट सुपरहिट ठरला होता. या चित्रपटासोबतच पंकज उधास यांच्या आवाजानेही सर्वांना वेड लावले. १९८६ मध्ये उधास एक सफल पार्श्वगायक झाले होते. त्यांच्या साजन, ये दिल्लगी, फिर तेरी कहानी याद आई अशा अनेक चित्रपटांमधील गाण्यांमुळे उधास लोकप्रिय झाले. १९९६ ते २००६ या कालावधीत त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. २००६ मध्ये त्यांना पदमश्री या सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

१९८० मध्ये त्यांचा आहट हा प्रसिद्ध झाला होता. त्यांनतर सातत्याने त्यांचे अनेक अलबम प्रसिद्ध झाले. यामध्ये मुक़र्रर, तरन्नुम, नबील, नायाब, शगुफ्ता, अमन, महफ़िल, राजुअत (गुजराती), बैसाखी (पंजाबी), गीतनुमा, याद, स्टॉलेन मूवमेंट्स, कभी आँसू कभी खुशबू कभी नाघुमा, हमनशीं, आफरीन, वो लड़की याद आती है, रुबाई, महक, घूंघट, मुस्कान, इन सर्च ऑफ मीर, हसरत, भालोबाशा (बंगाली), एंडलेस लव, यारा, शब्द, शायर (२०१०) या अल्बम्सचा समावेश आहे.

प्रसिद्ध गझल गायक पंकज उधास यांच्या निधनाच्या वृत्ताने सिनेसृष्टीला मोठा धक्का बसला आहे. आपल्या जादुई आवाजाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणारा आवाज आज हरपला आहे. वयाच्या ७२व्या वर्षी पंकज उधास यांनी मुंबईतल्या ब्रीचकँडी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. उधास परिवार. पंकज उधास यांच्या जाण्याने संगीत विश्वावर शोककळा पसरली आहे.पंकज उधास यांची लव्हस्टोरी फिल्मी आहे. शेजारच्या नातेवाईकांनी पंकज यांची पत्नी फरीदा यांच्याशी पहिली भेट करून दिली होती. त्यावेळी पंकज उधास पदवीचे शिक्षण घेत होते. तर फरीदा हवाई सुंदरी होत्या. शेजारच्या नातेवाईकांनी दोघांची भेट करून दिल्यानंतर त्यांच्यात मैत्रीचं नातं निर्माण झालं. त्यानंतर दोघांच्या भेटीगाठी वाढल्या. सतत एकमेकांबरोबर वेळ घालवू लागल्यानंतर दोघांच्या मैत्रीचं रुपांतर प्रेमात झालं. पंकज व फरीदा यांच्या नात्यात धर्म आड येत होता. पण पंकज उधास त्यांच्या निर्णयावर ठाम होते. त्यांनी फरीदा यांच्याशीच लग्न केलं. लग्नानंतर दोन मुली झाल्या. एका मुलीचं नाव नायाब असून दुसऱ्या मुलीचं नाव रिवा उधास आहे. नायाब यांनी भारतीय शास्त्रीय संगीतकार ओजस अधिया यांच्याशी लग्न केलं आहे. नायाब यांचा म्युझिक बँड असून याद्वारे अनेक संगीताचे कार्यक्रम आयोजित केले जातात. तर पंकज उधास यांची दुसरी मुलगी रिवा यांचा देखील संगीत क्षेत्राशी संबंध आहे. पण त्या लाइमलाइटपासून दूर असतात.

## प्रगती गायकवाडची कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदकाला गवसणी



**बिदाल :** नागालँडची राजधानी कोहिमा येथील इंदिरा गांधी स्टेडिअममध्ये पार पडलेल्या 'खेलो इंडिया युनिव्हर्सिटी (वरिष्ठ) कुस्ती स्पर्धेत' माणदेशी कन्या आणि भारती विद्यापीठाची विद्यार्थीनी प्रगती विनोद गायकवाड हिने ६२ किलो वजनगटात घवघवीत यश संपादन करताना सुवर्णपदकाला गवसणी घातली.

प्रगती हिने सुरुवातीला पाच महिला कुस्तीगीरानां हरवून उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीच्या लढतीत प्रगतीने मुंबई विद्यापीठाची पैलवान उप महाराष्ट्र केसरी विजेती वैष्णवी पाटील हिला ६ - २ ने पराभूत केले. तर अंतिम फेरीच्या सुवर्णपदकाच्या लढतीत दिल्ली विद्यापीठाची महिला पैलवान जागतिक विजेती नितीका हिच्या बरोबर अटीतटीच्या लढतीत अगदी शेवटच्या काही सेंकदात पैलवान प्रगती हिने दोन गुणांची कमाई करीत ४-४ ने पराभूत करुन सुवर्णपदकावर नाव कोरले.

प्रगतीने आतापर्यंत राष्ट्रीय स्पर्धेत अनेक पदकांची कमाई केली असून जागतिक कुस्ती स्पर्धा हे तिचे ध्येय आहे. माण तालुक्यातील पांगरीची सुकन्या असलेली प्रगती ही धनकवडी पुणे येथील भारती विद्यापीठ मध्ये शारीरिक महाविद्यालयात शिक्षण घेत असून कुस्तीचे प्रशिक्षण भारतीय खेल प्राधीकरण मुंबई साई येथे घेत आहे.

## पर्यावरणपूरक शेतीसाधने वापरण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करणारा अर्थसंकल्प : धनंजय मुंडे

राज्याच्या अंतरिम अर्थसंकल्पात कृषी क्षेत्राच्या निरंतर विकासाला प्राधान्य देण्यात आले असून पर्यावरणपूरक शेती करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात आले असल्याची प्रतिक्रिया कृषीमंत्रीधनंजय मुंडेयांनी व्यक्त केली.राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत अंतिम अर्थसंकल्प सादर केला. याविषयी बोलताना कृषिमंत्रीधनंजय मुंडेम्हणाले, कृषी विभागाला ३६५० कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आलेला आहे. वातावरणीय बदलाला सामोरे जाताना पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी बांबू लागवडीचा पर्याय जागतिक दर्जाच्या संशोधनातून पुढे आला आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी अटल बांबू समृद्धी योजना राबवण्यास मान्यता देण्यात आली असून त्या अंतर्गत १० हजार हेक्टर क्षेत्रावर बांबू लागवड करण्यात येणार आहे.



शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी सुरू करण्यात आलेली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० घोषित करून त्यासाठी ७ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तसेच मागेल त्याला सौर कृषी पंप देण्यासाठी नव्या योजनेची घोषणा केली असून त्यासाठी ८ लाख ५० हजार कृषी पंपांची तरतूद करण्यात आली आहे. डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेअंतर्गत एक लाख शेतकऱ्यांना सौर ऊर्जेवरील कुंपणासाठी अनुदान देण्यात येणार आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी ६ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

याचबरोबरीने कृषी विभागाच्या अन्य योजनांनाही बळकटी देण्यासाठीचे नियोजन व सारासार विचार या अर्थसंकल्पातून करण्यात आला आहे. अहमदनगर बीड परळी वैद्यनाथ या प्रतिक्षित रेल्वे मार्गाच्या कामास गती देत त्यासाठी आवश्यक तरतूद देखील करण्यात आली आहे.

सामाजिक न्याय विभागांतर्गत धनंजय मुंडे यांच्या कार्यकाळात मूर्त स्वरूप प्राप्त झालेल्या स्व.गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या अंतर्गत ऊसतोड कामगरांसाठी अपघात विमा योजना कार्यान्वित करण्याचीही घोषणा आज करण्यात आली आहे. विविध समाजघटकांच्या कल्याणासाठी सुरू करण्यात आलेल्या आर्थिक विकास महामंडळ व शासकीय संस्थांना भरीव निधीची तरतूद करून खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय साधण्याचे काम अर्थसंकल्पात केले आहे, धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

प्रफुल पटेल काय म्हणाले...महाराष्ट्राच्या जनतेला समर्पित प्रगतीशील अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल महायुती सरकार आणि राज्याचे अर्थमंत्री मा. अजितदादा पवार यांचे अभिनंदन. अधिकाधिक पायाभूत सुविधा, आणि सर्व घटकांच्या विकासाचे लक्ष्य समोर ठेवून हा अंतरिम अर्थसंकल्प मांडण्यात आला. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरीब व पिछडलेल्या वर्गातील घटकांसाठी अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदी भविष्यातील सर्वसमावेशक विकासाची नांदी ठरणार आहेत, अशा शब्दांत प्रफुल पटेल यांनी बजेटचे कौतुक केले.

## ग्लोबल पब्लिक स्कूलमध्ये मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा




**हिंगोली :** हनुमान नगर भागातील शिव शाहू प्रतिष्ठाण पिंपळखुटा द्वारा संचलित नामवंत ग्लोबल पब्लिक स्कुल मध्ये मराठी राजभाषा दिन, दि २७ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध मराठी कवी विष्णू वामन शिरवाडकर यांच्या स्मरणार्थ आयोजित केला जातो, ज्यांना कुसुमाग्रज म्हणून ओळखले जाते.

सर्वप्रथम संस्थेचे अध्यक्ष प्रा. ज्ञानदत्त जऊळकर व शिक्षिकांनी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी साधना शेरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या आपण सर्वांनीही मराठीचा अभिमान बाळगावा. मराठी भाषा समृध्द करण्यासाठी तसेच जोपसण्यासाठी प्रयत्न करावेत.

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी,जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी ।
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी,
एवढ्या जगात माय मानतो मराठी ।।

तसेच वर्ग दुसरी मधील मुलींनी मराठी लोकगीतावर खूप छान नृत्य सादर केले. व शौर्य जगताप,आरुषी सातपुते,चैताली बेंगाल, सई जऊळकर या विध्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. ज्ञानदत्त जऊळकर, समन्वयक सुरेखा जगताप, सीमा जऊळकर, निर्मला पवार, आम्रपाली इंगोले, रुपाली काळे, शीतल वास्टर, शेहनाज सय्यद, साधना शेरे, अर्चना इंगळे,सीमा माखणे, अश्विनी जाधव, सविता वानरे, प्रतिभा काळे, कमळाजी जऊळकर ,श्री.सचिन नानवटे, आनंद शेळके,अवधूत भडंगे,मनीषा डुकरे,आदी उपस्थित होते.



## अवकाळी पावसाने ३७९१ हेक्टर क्षेत्राला फटका, रब्बी पिकांचे नुकसान

**बुलढाणा :** सोमवारी संध्याकाळी झालेल्या वादळी वारा आणिपाऊसव गारपिटीने तालुक्यातील गहू, हरभरा, मका, संत्रा, लिंबू आणि ज्वारी पिकाचे एकूण ३७९१ हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले आहे.- ऊाएठढखडएचएछढतालुक्यातील सुनगाव, जामोद, उसरा, चालठाणा, खेर्डा बु, खेर्डा खुर्द, हिंगणे बाळापूर, दादुलगाव, गौलखेड, पिंपळगाव काळे, आडोळ, मांडवा तसेच आदिवासी भागांमध्ये वादळी वाऱ्यासहपाऊसआणि गारपीट झाली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला रब्बी पिकाचा घास निसर्गाच्या तांडवाने हिसकावून घेतला. अनेक ठिकाणी मोठमोठी झाडे कोसळून नुकसान झाले. तसेच काही गावातील घरावरील तीन पत्रे उडाली. तर झाडे पडून नुकसान झाले. तसेच जळगाव ते जामोद रस्त्यावर अनेक ठिकाणी झाडे कोसळली आहेत. अद्यापही ती तशीच पडून आहेत. जळगाव आणि खेरडा रोडवरही झाडे कोसळली. अनेक ठिकाणी वीज खांबाच्या तारा तुटून पुरवठा खंडित झालेला आहे.

## बारीपाडा येथील कार्यकर्ते चैत्राम पवार यांना राज्य शासनाचा पहिला महाराष्ट्र वनभूषण पुरस्कार जाहीर

**मुंबई :** वन, वानिकी तसेच वन्यजीव संवर्धन क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल बारीपाडा (ता. साक्री, जि. धुळे) येथील कार्यकर्ते चैत्राम पवार यांना राज्य शासनाचा पहिला महाराष्ट्र वनभूषण पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. या पुरस्काराचे स्वरुप सन्मानचिन्ह, मानपत्र आणि वीस लाख रुपये असे आहे. महाराष्ट्र शासनाचा सर्वोच्च पुरस्कार असलेल्या महाराष्ट्र भूषण पुरस्काराच्या धर्तीवर महाराष्ट्र वनभूषण पुरस्कार देण्याची घोषणा वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली होती. या पुरस्काराबद्दल मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी चैत्राम पवार यांचे अभिनंदन केले आहे. चंद्रपूर येथे आयोजित ताडोबा महोत्सवात ३ मार्च रोजी श्री. पवार यांना महाराष्ट्र वनभूषण पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

राज्य शासनाने या पुरस्कार निवडीचा शासन निर्णय जाहीर करुन श्री. चैत्राम पवार यांच्या नावाची घोषणा केली. नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, सक्षमीकरण, स्वावलंबन, वनहक्क कायदा, कृषि विकास आणि शाश्वत विकास या विषयांवर मागील २६ वर्षापासून श्री. पवार हे आदिवासी समाजासोबत काम करीत आहेत. वनवासी कल्याण आश्रमाच्या मदतीने त्यांनी महाराष्ट्र आणि गुजरातमधील जवळपास १०० गावांमध्ये त्यांच्या कामाचा विस्तार केला आहे. सध्या श्री. पवार हे मराठवाडा आणि खान्देश भागासाठी या वनवासी कल्याण आश्रमाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

वनभूषण पुरस्कार निवडीबद्दल मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी अभिनंदन केले असून श्री. पवार यांचे आदिवासी क्षेत्रातील वनजमिनींच्या अनुषंगाने केलेले काम मोलाचे असल्याचे सांगितले. राज्य शासनाच्या वन विभागाच्या विविध कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन स्थानिक नागरिकांना त्यासाठी प्रोत्साहित करणे, राखीव वनक्षेत्र आणि आजूबाजूच्या परिसरातील गावात वृक्षलागवड आणि वनसंवर्धन आणि पर्यावरणासाठी त्यांचे काम उल्लेखनीय आणि इतरांना प्रेरित करणारे आहे, अशा शब्दांत श्री. मुनगंटीवार यांनी कौतुकोद्गार काढले.

चैत्राम पवार यांनी बारीपाडा येथे प्रथम पीपल्स बायोडायव्हर्सिटी रजिस्टर उपलब्ध केले असून धुळे जिल्ह्यात ते नियमितपणे अद्यावत केले जाते. संरक्षित क्षेत्रातून लागवड नसलेल्या रानभाज्यांची रेसिपी करुन जंगलातील पारंपरिक ज्ञान त्यांनी इतरांपर्यंत पोहोचवले आहे. सिंचनासाठी भूजलाचा काटकसरीने वापर, मृद व जलसंधारणाची कामे, सौर ऊर्जेचा वापर, प्रदूषण कमी करण्यासाठी प्रयत्न, सार्वजनिक आरोग्यविषयक प्रश्नांची सोडवणूक आदी माध्यमातून त्यांनी केलेल्या कामाची दखल राज्य शासनाने या सर्वोच्च पुरस्काराच्या माध्यमातून घेतली आहे.

## अवधूत गुप्ते यांच्या बहारदार सादरीकरणाने महाबळेश्वरकर मंत्रमुग्ध

**महाबळेश्वर :** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदचे शंभरावे विभागीय नाट्य संमेलनाचा समारोप अवधूत गुप्ते यांचा संगीत रजनी या कार्यक्रमाने येथील पोलीस परेड मैदानावरील छत्रपती शिवाजी महाराज नाट्य नगरीमध्ये झाला

अखेरच्या दिवशी सकाळी हस्तांतरण सोहळा उद्योगमंत्री ना उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला ना सामंत यांच्या हस्ते नटराजाची मूर्ती व घंटा ही पुढील विभागीय नाट्य संमेलन अहमदनगर येथे होणार असल्याने तेथील सदस्यांना सुपूर्त करण्यात आली



सकाळी महाबळेश्वर येथील शालेय विद्यार्थ्यांनी सादर केलेला शिवराज्याभिषेक सोहळा खऱ्या अर्थाने नेत्रदीपक ठरला तदनंतर स्थानिक महिलांचे सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला दुपारी मुख्य सभामंडपात बालचमू साठी टेड्डी आणि डोरेमॉन व फुग्यातला राक्षस ही व्यावसायिक बालनाट्याचे प्रयोग झाले याला बालचमूंचा मोठा प्रतिसाद लाभला दुपारी ''नाटक माझ्या चष्म्यातून'' या परिसंवादास सिनेअभिनेते ऋषिकेश जोशी यांनी सिक्कीमचे माजी राज्यपाल,खा श्रीनिवास पाटील व महाबळेश्वरचे दिव्यांग उद्योजक डॉ भावेश भाटिया यांची मुलाखत घेतली या दोघांनी देखील नाटकाबद्दल आपले मते व्यक्त केली खा पाटील व डॉ भावेश भाटिया यांच्या शेरोशायरीने रसिकांची वाहवा मिळविली अभिनेते ऋषिकेश जोशी यांनी परिसंवादादरम्यान खा श्रीनिवास पाटील याना थेट चित्रपटामधे काम करण्याची ऑफर दिली यावर देखील आपल्या खुमासदार शैलीत दिलेली उत्तरांवर रसिक फिदा झाले

सायंकाळी महाराष्ट्राची लोकधारा या महाराष्ट्रातील नामवंत कलावंतांनी सादर केलेला कार्यक्रम रसिकांना भावला भारूड लावणी वारी ने कार्यक्रमाची शोभा वाढली तदनंतर अभिनेता, दिग्दर्शक, लेखक, गीतकार, संगीतकार आणि पार्श्वगायक अवधूत गुप्ते यांनी 'गणाधीश' या गाण्यातून श्री गणरायाला वंदन करत आपल्या गायनाची सुरुवात केली पुढे त्यांनी गाजलेले काय सांगू राणी मला गाव सुटना,आयुष्य हे चुलीवरल्या कढईतले कांदे पोहे..,तुमच्या फॅमिलीत या केळेवाली ला घेणार का ..ही गीते सादर करत वातावरणात जोश निर्माण केला या सगळ्याच गाण्यावर महाबळेश्वर करांनी एकच जल्लोष करत त्यांना उत्स्फूर्त दाद दिली या कार्यक्रमास तुफान प्रतिसाद मिळाला जय जय महाराष्ट्र माझा या गीताने शंभराव्या नाट्य संमेलन सोहळ्याची सांगता झाली.नाट्य संमेलन यसश्वीतेसाठी सहकार्य करणाऱ्या प्रयोजकांचे नियामक मंडळ सदस्य राजेश कुंभारदरे व शाखा अध्यक्ष डी एम बावळेकर यांच्या हस्ते सन्मान करून आभार मानण्यात आले.

# कोयना (शिव सागर) येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून जागतिक दर्जाचे जल पर्यटन विकसित होणार : मुख्यमंत्री

## महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्यात सामंजस्य करार

**मुंबई :** सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील मुनावळे येथे शिव सागर जलाशयामध्ये जागतिक दर्जाचे जल पर्यटन विकसित करण्यासाठी, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये सामंजस्य करार झाला.

विधानभवन येथे झालेल्या सामंजस्य करारावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्य उत्पादन शुल्क मंत्री तथा सातारा जिल्हा पालकमंत्री शंभूराज देसाई, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, पर्यटन विभागाच्या सचिव जयश्री भोज,महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक श्रद्धा जोशी -शर्मा, जलसंपदा विभागाचे उपसचिव अतुल कपोले, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे सल्लागार सारंग कुलकर्णी उपस्थित होते. या प्रकल्पाच्या माध्यमातून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे ५ हजारपेक्षा अधिक स्थानिक नागरिकांना रोजगार मिळेल आणि पर्यटनातून १०० कोटीपेक्षा अधिक आर्थिक उलाढाल होईल. अशी माहिती यावेळी देण्यात आली.

नैसर्गिक वरदान लाभलेला परिसर

शिवसागर जलाशयात जल पर्यटन विकसित करण्यासाठी मोठी संधी आहे. कोयना (शिव सागर), ता. जावळी हा परिसर येथील सह्याद्री डोंगराच्या रांगा,



गर्द झाडी, निळेशार पाणी, समृध्द जैवविविधतेचे आगार असलेला, नैसर्गिक वरदान लाभलेला परिसर आहे. नव्याने होणाऱ्या जलपर्यटन केंद्राच्या माध्यमातून स्थानिकांना रोजगार मिळावा, या भागाचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने हे जल पर्यटन केंद्र विकसित करण्यात येणार आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून या प्रकल्पासाठी ४५ कोटी ३८ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

महाराष्ट्राला मोहक ७२० किमीचा सागरी किनारा तसेच निसर्गसंपन्न छोटे - मोठे जलाशय, धरणे, प्रदूषण मुक्त नद्या यांचे वैभव लाभलेले आहे. या ठिकाणी जल पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक अर्थव्यवस्था वृद्धिंगत करण्यास आणि स्थानिकांना रोजगाराच्या संधी निर्माण करण्यास मोठा वाव आहे.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्कूबा डायव्हिंग प्रकल्पामुळे सिंधुदुर्गात पर्यटक मोठ्या प्रमाणत आकर्षित झाले. नाशिक बोट क्लबचे प्रचलन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ करीत आहे. बोट क्लब पर्यटकांमध्ये लोकप्रिय झालेले आहे. त्यामुळे मुंबई, पुणे, ठाणे आणि गुजरातमधून नाशिकला येणाऱ्या पर्यटकांचा ओघ वाढला. हा अनुभव बघता शासनाने महाराष्ट्रात नाविन्यपूर्ण आणि जागतिक दर्जाचे जल पर्यटन प्रकल्प राबविण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

या प्रकल्पामुळे महाबळेश्वर, पाचगणी, वाईला येणारा पर्यटक कोयना जलाशयाच्या अवतीभोवती असलेल्या ग्रामीण भागात वळेल, तसेच पर्यटकांचा साताऱ्यात राहण्याचा काळ आणि खर्च करणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढेल. त्यामुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था वाढीस लागून स्थानिकांना मोठ्या प्रमाणात शाश्वत रोजगार आणि व्यवसायाच्या संधी निर्माण होतील. अशी माहिती यावेळी देण्यात आली.

देशातील पहिले नाविन्यपूर्ण गोड्या पाण्यातील स्कूबा डायव्हिंग

या प्रकल्पामध्ये पर्यटकांच्या सोयीसाठी विविध पायाभूत सुविधा आणि जल पर्यटन प्रकार असतील. भव्य पॅव्हेलियन, कॉन्फरन्स हॉल, जलतरण तलाव, भारतातील पहिले नाविन्यपूर्ण गोड्या पाण्यातील स्कूबा डायव्हिंग, जल सफर मध्ये पर्यटन प्रकल्पात मोठी क्रुझ बोट ज्यामध्ये १०० च्या वर पर्यटक बसून, नाश्ता आणि जेवण याबरोबर कोयना जलाशयाच्या अवतीभोवतीच्या सह्याद्री पर्वत रांगा, हरित जंगले, वन्य जीव याचा आनंद घेऊ शकतात, भारतातील पहिली अत्याधुनिक आणि अलिशान हाउस बोट, सौर उर्जा/बॅटरीवर चालणारी बोट, अत्याधुनिक प्रवासी बोटी, हवेत उडणारी बोट, अत्यंत वेगवान जेट बोट, पॅरासेलिंग बोट, गोड्या पाण्यात पहिल्यांदा सेलिंग यॉट (शिडाची नौका) आणि त्याशिवाय आकर्षक वॉटर स्पोर्टस असतील. अशाप्रकारच्या जल पर्यटनाची आकर्षणे तसेच पायाभूत सुविधा असलेला हा भारतातील पहिला जल पर्यटन प्रकल्प असेल. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात पुढील १० दिवसामध्ये प्राथमिक जल पर्यटन सुरु करण्यात येईल. दुसऱ्या टप्प्यात (८ महिन्यात) नवीन बोटी आणि इतर जल पर्यटन आकर्षणे यांचा अंतर्भाव करण्यात येईल. तिसरा आणि अंतिम टप्प्यात (२० महिन्यात) संपूर्ण नवीन भव्य वास्तू, क्रुझ बोट, हाउस बोट यांचा अंतर्भाव करून प्रकल्प पूर्ण केला जाईल.

### प्रकल्पात पायाभूत सुविधा आणि विविध जल पर्यटन प्रकार

**प्रकल्पातील पायाभूत सुविधांमध्ये नाविन्यपूर्ण जल पर्यटन केंद्र, पर्यटकांसाठी भव्य आसन व्यवस्था, विविध प्रकारच्या खाद्य प्रकारांचे उच्च दर्जाचे उपहारगृह, पर्यटकांसाठी विविध सुविधा व प्रशासकीय कार्यालय, जलतरण तलाव, स्कूबा प्रशिक्षण तलाव, कॉन्फरस हॉल, व्यवस्थापक आणि कर्मचाऱ्यांसाठी निवासाची सोय, बोटींसाठी आणि पर्यटकांसाठी उतरंडी, तरंगती जेट्टी (मरीना), वाहनतळ,आकर्षक बगीचा असतील.**

**यामध्ये विविध जल पर्यटन प्रकार जेट स्की, जेटो व्हेटर (पाण्यात उडणे), बम्पर राईड, कयाकिंग, बनाना राईड, सेलिंग, नाविन्यपूर्ण कृत्रिम तलावात गोड्या पाण्यातील स्कूबा डायव्हिंग, हवेत उडणारी बोट, फ्लाईंग फिश, अतिवेगवान जेट बोट राईड, सौर/विद्युत बोट, पर्यटकांसाठी आरामदायी प्रवाशी बोट, व्हर्ल पूल राईड, पॅरासेलिंग, अलिशान लेक क्रूझिंग प्रवासी बोट, अलिशान वेगवान बोट, मरीना, भारतातील पहिली अत्याधुनिक, अलिशान हाउस बोट असे विविध नाविन्यपूर्ण जल पर्यटन प्रकार असतील.**

# प्रधानमंत्री यांच्या हस्ते पी.एम.किसान सन्मान निधी व नमो शेतकरी महासन्मान निधी योजनांच्या निधीचे होणार वितरण

### २८ फेब्रुवारी २०२४ हा दिवस संपूर्ण देशभर पी. एम. किसान उत्सव दिवस म्हणून साजरा होणार

**मुंबई :** पी.एम. किसान सन्मान निधी योजनेच्या माहे डिसेंबर २०२३ ते मार्च २०२४ कालावधीतील १६ वा हप्ता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बुधवार, दि २८ फेब्रुवारी, २०२४ रोजी यवतमाळ येथील समारंभात वितरीत होणार आहे. पी. एम. किसान योजने अंतर्गत रू. २०००/ तर नमो शेतकरी महासन्मान निधी योजने अंतर्गत दुसरा व तिसरा हप्ता मिळून रू. ४०००/ असा एकुण रू. ६०००/ चा लाभ दि. २८ फेब्रुवारी, २०२४ च्या समारंभात राज्यातील सुमारे ८८.०० लाख पात्र शेतकरी कुटुंबांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा करण्यासंदर्भातील कार्यवाही करण्यात येईल. केंद्र शासनाने दि. २८ फेब्रुवारी, २०२४ हा दिवस संपूर्ण देशभर पी. एम. किसान उत्सव दिवस म्हणून साजरा करण्याचे निर्देश दिले आहे.




या समारंभास राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि राज्यमार्ग मंत्री नितीन गडकरी, रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, वने, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री गिरीश महाजन, यवतमाळ-वाशिमचे पालकमंत्री संजय राठोड, कृषी मंत्री धनंजय मुंडे, गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, केंद्रीय मागासवर्ग आयोग अध्यक्ष हंसराज अहिर आदी उपस्थित राहणार आहेत.

शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न देण्याकरीता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी. एम. किसान) योजना माहे फेब्रुवारी, २०१९ पासून सुरु केली आहे. या योजनेच्या निकषांनुसार सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये) रु. २०००/- प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रती वर्षी रू. ६०००/- त्यांच्या आधार व डीबीटी संलग्न सक्रीय बँक खात्यात लाभ जमा करण्यात येत आहे. पी. एम. किसान योजनेअंतर्गत दि. २४ फेब्रुवारी, २०२४ अखेर राज्यातील ११३.६० लाख शेतकरी कुटुंबांना एकूण १५ हप्त्यांमध्ये रू. २७६३८ कोटीचा लाभ जमा झालेला आहे.

समारंभास शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष व ऑनलाईन पदधतीने सहभागी व्हावे - कृषीमंत्री धनंजय मुंडे

हा समारंभ केंद्र शासनाचा कृषी विभाग व महाराष्ट्र शासन यांनी एकत्रित राबविण्याचे नियोजन केले आहे. तसेच महाराष्ट्र राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा दुसऱ्या व तिसऱ्या हप्त्यांचा एकत्रित लाभही प्रधानमंत्री यांच्या हस्ते या समारंभात वितरीत होणार आहे. पी. एम. किसान योजना व नमो शेतकरी महासन्मान निधीच्या लाभ वितरण समारंभात https://pmindiawebcast.nic.in या लिंकआधारे सहभागी होण्यासाठी राज्यातील सर्व शेतकरी बांधवांना आवाहन करण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या पी. एम. किसान योजनेच्या १६ व्या हप्त्याच्या लाभ वितरणावेळी रक्कम रू. १९४३.४६ कोटीचा लाभ राज्यातील भूमि अभिलेख नोंदी अद्ययावत केलेल्या, बँक खाती आधार संलग्न केलेल्या व ई-केवायसी पूर्ण केलेल्या एकुण ८७.९६ लाख शेतकरी कुटुंबांच्या बँक खात्यात थेट हस्तांतरणाद्वारे जमा होणार आहे. राज्यात कृषि विभागामार्फत गावपातळीवर विशेष मोहीमेद्वारे राज्यातील सुमारे १८ लाख लाभार्थींची पी.एम. किसान योजनेच्या लाभासाठी आवश्यक बाबींची पूर्तता झालेली आहे. त्यामुळे या लाभार्थींना पी.एम.किसान व नमो शेतकरी महासन्मान निधी या योजनांचा दुहेरी लाभ मिळणे शक्य झाले आहे.

राज्यात सन २०२३-२४ पासून पी. एम. किसान योजनेच्या धर्तीवर नमो शेतकरी महासन्मान योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पी. एम. किसान योजनेच्या हप्ता वितरणावेळी लाभ देण्यात आलेल्या पात्र शेतकरी कुटुंबांना राज्याच्या या योजनेचा लाभ अदा करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाने पी. एम. किसान योजनेच्या १४ व्या हप्त्याचा लाभ अदा झालेल्या राज्यातील ८५.६० लाख शेतकरी कुटुंबाना नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा पहिला हप्ता रक्कम रू. १७१२ कोटी यापूर्वी अदा केलेला आहे. महाराष्ट्र शासन सन २०२३-२४ मधील उर्वरीत दुसरा व तिसरा हप्ता एकत्रितरित्या या समारंभात राज्याच्या योजनेमधून जवळपास रू. ३८०० कोटी थेट शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा होणार आहे.

# मानवता हाच खरा धर्म : चर्मकार हा सामाजिक ऐक्य जोपासणारा समाज : आ. दिपकराव चव्हाण

**फलटण :** मानवता हाच खरा धर्म असून, सामाजिक ऐक्य जोपासणाऱ्या चर्मकार समाजाने आपल्या बांधवाना मदतीचा हात देऊन एकमेकांच्या प्रगतीसाठी साथ करावी असे आवाहन फलटण - कोरेगाव विधानसभा मतदार संघाचे लोकप्रतिनिधी आ. दिपकराव चव्हाण यांनी केले.

श्री संत रोहिदास महाराज यांच्या ६४७ व्या जयंतीनिमित्त फलटण येथे आयोजित कार्यक्रमात आ. चव्हाण बोलत होते, यावेळी श्री सेवागिरी देवस्थानचे मठाधिपती प.पू. महंत सुंदरगिरी महाराज, माजी नगरसेविका सौ. प्रगतीताई कापसे, पंचायत समिती माजी सदस्य सचिन रणवरे, पत्रकार यशवंत खलाटे पाटील, संतोष चव्हाण, गणपतराव भोसले, ज्ञानेश्वर भगत, शशिकांत भोसले यांच्यासह अन्य मान्यवर विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.



देवाने जीवसृष्टी तयार करताना, मानव प्राण्याचीही निर्मिती केली, मानवाला बुद्धी, भावना व्यक्त करण्यासाठी भाषा दिली, मात्र इतर प्राण्यांना हे दिले नाही, पुढे माणूस समूहाने एकत्र राहु लागला, आणि त्या त्या प्रदेशानुसार माणसाचे नियम वेगवेगळे झाले, मग हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन असे धर्म सोयीसाठी बनले, सर्व धर्म चांगलेच आहेत, कोणताच धर्म दुसऱ्या धर्माविषयी चुकीचा विचार सांगत नाही, पण तरीही नेहमी दोन धर्मांमध्ये भांडण/वाद होतात या पार्श्वभूमीवर मानवता हाच खरा धर्म असून सर्व संतांनी सुद्धा मानवता धर्माचाच पुरस्कार केला असल्याचे निदर्शनास आणून देत, माणुसकीचे वर्तन म्हणजेच मानवता धर्म असून जे मला हवे ते दुसऱ्यालाही देणे म्हणजेच खरी माणुसकी असल्याचे स्पष्ट प्रतिपादन आ. दिपकराव चव्हाण यांनी केले.

श्री संत रोहिदास महाराज यांचे विचार आपण सर्वांनी आत्मसात करुन समाजातील गरजू गरिबांना खरी मदत केली पाहिजे व त्या गरीब लोकांना खऱ्या अर्थाने प्रवाहात आणण्यासाठी सर्वांनी तन, मन, धनाने पुढे आले पाहिजे तर खरी मानवतेची भावना निर्माण होईल व समाज खऱ्या अर्थाने सक्षम होईल, संत गाडगे बाबांनी भुकेलेल्यांना अन्न दिले, तहानलेल्यांना पाणी पाजले, रोग्यांची सेवा केली, धर्मशाळा बांधल्या, सावित्रीबाई फुले, महात्मा फुलेंनी शाळा काढली हे खरे मानवता धर्माचे पाईक आहेत. आपणही आपल्या आयुष्यात दुसऱ्यांच्या सुखासाठी, आनंदासाठी, हितासाठी काही करु शकत असू तर आपणही मानवता धर्माचा पाईक होऊ अशी भावना आ. दिपकराव चव्हाण यांनी व्यक्त केली.

कोणत्याही धर्माने फक्त आपलाच धर्म श्रेष्ठ आहे आणि दुसऱ्यांचा नाही ही भावना कधीही व्यक्त केली नसल्याचे स्पष्ट करताना सर्वात महत्त्वाचा धर्म म्हणजे मानवता धर्म असून एकमेकांवर प्रेम, आपुलकी, एकमेकांना मदत करणे, प्रत्येका विषयी सहानुभूती ठेवणे, आदर मनात बाळगणे, समोरच्याला कधीही तुच्छ न लेखणे, तो गरीब असो की श्रीमंत असो, कोणत्याही वर्णाचा असो, कुठल्याही जाती धर्मातून आलेला असो, आपल्या मनात त्यांच्याविषयी प्रेम आपुलकी व सहानुभूती बाळगणे हाच खरा मानवता धर्म असे स्पष्ट प्रतिपादन आ. दिपकराव चव्हाण यांनी केले.

चर्मकार समाजाने स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण केली असून कुठेही वाद किंवा इतर गोष्टीपासून दूर असतो, त्यामुळे चर्मकार समाजाकडे पाहण्याचा सर्वांचाच दृष्टिकोन अतिशय चांगला असून एकमेकांची मदत करुन सर्वांना बरोबर घेऊन समाजाला पुढे नेण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन आ. चव्हाण यांनी समाज बांधवांना केले.

प्रा. अरुण खरात यांनी प्रारंभी सर्व उपस्थितांचे स्वागत केल्यानंतर प्रास्ताविकात कार्यक्रमाविषयी माहिती दिली, समाज संघटनेच्या कार्याचा आढावा घेतला, प्राचार्य विठ्ठल हंकारे यांनी सूत्रसंचालन, सागर भोईटे यांनी समारोप व आभार प्रदर्शन केले.

यावेळी अध्यक्ष भोलेनाथ भोईटे, हृदयनाथ भोईटे, डॉ. रोहिदास साळे, संतोष पोटफोडे, गणेश भोईटे, तुकाराम भोईटे, संतोष दगडे, संतोष भोईटे, संतोष कांबळे, रोहिदास पवार यांच्यासह समर्थ प्रतिष्ठानचे पदाधिकारी व चर्मकार बांधव भगिनी व जेष्ठ मार्गदर्शक तसेच तरुण तरुणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मिरज जि. सांगली येथील उद्योजक तानाजी सातपुते यांना आ. दिपकराव चव्हाण, मठाधिपती प.पू. महंत सुंदरगिरी

## शासकीय वस्तीगृहामध्ये प्रवेशासाठी जाहिर आवाहन

**सातारा :** इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत सातारा जिल्हयामध्ये मुलांचे व मुलींचे प्रत्येकी एक वस्तीगृह कार्यान्वीत आहे. सदर वस्तीगृहाची २०२३-२४ यावर्षीची प्रवेश प्रकीया ऑफलाईन पदधतीने होणार असुन प्रवेश अर्ज भरण्याकरता सातारा जिल्हातील उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यानां प्रवेश दिला जाईल. ऑफलाईन पदधतीने प्रवेशासाठी अर्ज करावयाचा कालावधी २० फेब्रूवारी ते ५ मार्च २०२४ पर्यंत आहे.

तरी शासकीय वस्तीगृहामध्ये प्रवेशासाठी विद्यार्थ्यानी सहायक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण, सातारा यांचेकडे संपर्क साधुन प्रवेश अर्ज भरावेत असे श्री संतोष जाधव सहायक संचालक इतर मागास बहुजन कल्याण सातारा हे जाहिर अवाहन करीत आहे.

## विभागस्तरीय नमो महारोजगार मेळाव्याचे बारामतीत आयोजन

**सातारा :** कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागीय आयुक्तालय पुणे यांचे वतीने बारामती येथे ०२व ०३ मार्च २०२४ रोजी सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी विभागस्तरीय नमो महारोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे.

सदर मेळाव्यात एसएससी, एचएससी, ग्रॅज्युएट, पोस्ट ग्रॅज्युएट, आयटीआय, डिप्लोमा, इंजिनीयरींग अशा प्रकारची रिक्तपदे असणा-या ३५० पेक्षा जास्त आस्थापनांनी सहभाग नोदंवला असुन ४८ हजार पेक्षा जास्त खाजगी रिक्तपदांसाठी आस्थापनांमध्ये भरती केली जाणार आहे. सुशिक्षित उमेदवारांनी अधिक माहितीसाठी https://rojgar.mahaswayam.gov.in या पोर्टलवर भेट द्यावी. सातारा जिल्हयातील नोकरी इच्छूक उमेदवारांनी दि. २ व ३ मार्च २०२४ रोजी विद्या प्रतिष्ठानचे आर्टस, कॉमर्स, एण्ड सायन्स कॉलेज,विद्यानगरी बारामती येथे आपल्या शैक्षणीक कागदपत्रांसह उपस्थित राहुन विभागस्तरीय नमो महारोजगार मेळाव्यामध्ये जास्तीत जास्त उमेदवारांनी सहभाग घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविण्यता जिल्हा कार्यकारी समिती सातारा यांनी केले आहे.

# सातारा पालिकेसाठी १३ कोटी तर, मेढा नगरपंचायतीसाठी ३ कोटी ७० लाख

## आ. शिवेंद्रसिंहराजे; सातारा शहरातील ४४ आणि मेढा शहरातील ५ विकासकामे लागणार मार्गी

**सातारा :** आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या विशेष प्रयत्नातून राज्याच्या नगर विकास विभागामार्फत सातारा नगर पालिकेसाठी १३ कोटी ते मेढा नगरपंचायतीची ३ कोटी ७० लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून मंजूर झालेल्या या निधीतून सातारा शहरातील ४४ तर, मेढा शहरातील ५ विकासकामे मार्गी लागणार आहेत. निधी मंजूर केल्याबद्दल आ. शिवेंद्रसिंहराजेंनी मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस आणि ना. अजित पवार यांचे आभार मानले आहेत.

आ. शिवेंद्रसिंहराजे यांच्या मागणीनुसार सातारा शहरातील कब्रस्थान येथे संरक्षक भिंत बांधणे यासाठी २५ लाख, मंगळवार पेठेतील खारी विहिर येथे दोन मजली समाजमंदिर बांधणे ८० लाख, यादोगोपाळ पेठ ३९३ येथे सभामंडप बांधणे १५ लाख, सरस्वती कॉलनी येथे बंदिस्त गटर १५ लाख, जिल्हा परिषद कॉलनी येथे आरसीसी बंदिस्त गटर १४ लाख, शाहूपुरी गणराया हौसिंग सोसायटी येथे वाचनालय बांधणे ५० लाख, रांगोळे कॉलनी येथे पोहण्याचा तलाव बांधणे १ कोटी २५ लाख, गणराया कॉलनी येथे बंदिस्त गटर व लक्ष्मीनगर येथे रस्ता डांबरीकरण करणे १० लाख, गोळीबार मैदान येथील नंदादीप सारंग येथे रस्ते व गटर करणे ३० लाख, सह्याद्री पार्क गडकर आळी येथे रस्ता व गटर ४० लाख, देशमुख कॉलनी व मुथा कॉलनी अंतर्गत रस्ते खडीकरण व डांबरीकरण १ कोटी ७५ लाख, बापूजी साळुंखे नगर व गणेश नगर रस्ते व गटर करणे २० लाख, अजीज कलाल घर ते शंकर कवाडे घर ओढ्यास संरक्षक भिंत २० लाख, कोयना सहजीवन सोसायटी येथे रस्ते व गटर २५ लाख, केसरकर पेठ श्री घोरपडे घर ते इन्फिनिटी अपार्टमेंट अखेर रस्ता करणे १० लाख, डीसीसी बँक ते प्रवीण जाधव घर रस्ते व गटर करणेसाठी २० लाख रुपये निधी मंजूर झाला आहे.

कृष्णकुंज अपार्टमेन्ट येथे मोकळी जागा विकसित करणे २५ लाख, सोमवार पेठ १३८ येथील सभागृहाचे उर्वरित काम करणे २५ लाख, फॉरेस्ट कॉलनी गिरिचिंतन तलाठी कॉलनी येथे मोकळ्या जागेत काँक्रीटीकरण ४५ लाख, कुंभारवाडा केसरकर पेठ येथील अंतर्गत रस्ता काँक्रीटीकरण करणे २५ लाख, सह्याद्री पार्क लक्ष्मीनगर येथे आरसीसी बंदिस्त गटर १७ लाख, शाहूपुरी, अवधूत चिंतन खटावकर कॉलनी येथे सभामंड्प २० लाख, भास्कर मेहेंदळे घर आजाद कॉलनी ते करंजे पार अखेर रस्ता खडीकरण, डांबरीकरण २० लाख, करंजे कमान ते भैरवनाथ मंदिर ते करंजे पार अखेर रस्ता खडीकरण, डांबरीकरण २५ लाख, सर्वोदय कॉलनी शाहूपुरी रस्ता व गटर ३५ लाख, करंजे पेठ श्री मंगलमूर्ती गणेश सेवा मंडळ समाजमंदिर बांधणे २० लाख, खेड येथील जयमल्हार कॉलनी अंतर्गत रस्ते १० लाख, खेड गुलमोहर कॉलनी वॉर्ड २ मध्ये अंतर्गत रस्ते १० लाख, पिरवाडी वॉर्ड ३ मध्ये मिस्त्री कॉलनी येथे रस्ते १० लाख, प्रभाग १८ अ कामाठीपुरा येथे बंदिस्त गटर १० लाख, प्रभाग १८ मधील नवीन हद्दवाढ झालेल्या सोसायटीत बंदिस्त गटर १० लाख, प्रभाग १९ पॉवर हाऊस पाण्याची टाकी ते संजय किसन चौगुले घर मंगळवार पेठ येथे खडीकरण डांबरीकरण करणे ३० लाख, धस कॉलनी अंतर्गत खडीकरण डांबरीकरण १५ लाख, संत कबीर सोसायटी ४४६ मंगळवार पेठ अंतर्गत काँक्रीट रॉड व पायऱ्या, गटर करणे १० लाख, पै चौक ते देवी चौक रस्ता डांबरीकरण व गटर १ कोटी १० लाख, शनिवार पेठ सप्तशृंगी मंदिर ते १००६ फ ओढा येथे काँक्रीटीकरण २५ लाख, कूपर कॉलनी नाना नानी पार्क कम्पाउंड, गेट व इतर सुविधा २० लाख, शाहूपुरी मेन रस्ता ते प्रतीक डुप्लेक्स रस्ता काँक्रीटीकरण २० लाख, भू विकास बँक मागे अमृत कॉलनी येथे ५०० मीटर रस्ता दंबरीकरण ५०० मीटर पाण्याची पाईप टाकणे ३४ लाख, करंजे पेठ स्वागत कमान शेजारी नगर पालिकेची जागा विकसित करणे २० लाख, सूर्यवंशी कॉलनी ते सागर कन्या कमान शिवशंभो महादेव मंदिर डांबरीकरण १० लाख, निसर्ग कॉलनी पुलाशेजारी संरक्षक भिंत १० लाख आणि ६६५/६६४ मंगळवार पेठे येथे बास्केट बॉल कोर्टला विद्युतीकरण/ विकसित करणे यासाठी १५ लाख रुपये निधी मंजूर झाला आहे.

मेढा नगर पंचायत हद्दीत बीएसएनएल कार्यालयालगत नगरपंचायत मालकीच्या जागेत बागबगीचा उद्यान विकसित करणेसाठी २ कोटी, पठाण ओढा ते ग्रामीण रुग्णालय साकव पुलापर्यंत रस्ता रुंदीकरण खडीकरण डांबरीकरण करणे २० लाख, शशिकांत गुरव घराच्या पाठीमागे गोरे यांच्या शेताकडे नदीकडील बाजूस बंदिस्त गटर संरक्षक भिंत ३० लाख, गांधीनगर अंतर्गत गटर व रस्ते ३० लाख आणि वेण्णा हायस्कुल लगत संरक्षक भिंत बांधणे यासाठी ९० लाख रुपये निधी मंजूर झालं आले. निविदा प्रक्रिया व इतर शासकीय सोपस्कार तातडीने पूर्ण करून कामे त्वरित सुरु करा आणि कामे दर्जेदार करून वेळेत पूर्ण करा, अशा सूचना आ. शिवेंद्रसिंहराजे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केल्या आहेत.

